**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ०७ दिनांक १३/०२/२०२४**

# मोखाडा पोलीस ठाणे येथे दाखल खूनाचा गुन्हा उघड करण्यात पालघर पोलीसांना यश.

दि.०३/०२/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजता मोखाडा पोलीस ठाणे हद्दीतील वैतरणा नदिवरील पुलाचे खाली एक अनोळखी २५ ते ३० वयोगटातील इसमाचे प्रेत मिळून आले होते. त्याचे डावे हातावर राणा राजपुत मराठी अक्षरात गोंदलेले, उजव्या हातावर मराठीत आईबाबा व त्यापुढे लव चे चिन्हामध्ये इंग्रजीत S.D. अक्षर गोंदलेले व अंगठ्याजवळ मराठीत तमन्ना असे अक्षर गोंदलेले त्याचे अंगात गोल गळ्याचा हाफ बाह्यचा छातीवर वरच्या बाजुस सफेद रंगाचा व त्याखाली पिस्ता रंगाचा टिशर्ट व काळ्या रंगाची फुल पँट व गळ्यात थंडीसाठी वापरण्यात येणारा सफेद निळया जांभळया रंगाचा गोल स्कार्प अशा वर्णनाचे इसमाचे प्रेत मिळूण आल्याने सदर बाबत मोखाडा पोलीस ठाणे गुरंन । १८/२०२४ भादविस कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा घडल्यानंतर श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. शैलेश काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी जव्हार विभाग, श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे व स्थानिक गुन्हे शाखा पालघर व मोखाडा पोलीस ठाणे यांचे संयुक्तरीत्याने मयत व आरोपीताचा ओळखीचा कोणताही पुरावा नसताना मयताची पोउपनि/गणपत सुळे, पोउपनि/वानखेडे, पोउपनि/सावंतदेसाई, व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार यांनी केलेल्या तांत्रीक तपसाद्वारे ओळख पटवून मयताचे नाव निष्पन्न करुन त्याद्वारे अधिक तपास करीत सदरचा गुन्हा आरोपीत नामे १) पेंटय्या जंगल्या चित्तारी वय ३८ वर्षे, रा. इंदिरा नगर रुम नं. ०३ टिटवाळा ता. कल्याण जि. ठाणे मुळ रा. तांदुर शहर चंदु महाराज मार्ग ता. तांदुर जि. विकाराबाद राज्य तेलंगणा २) साईकुमार इलय्या कडामाछी वय २२ वर्षे, रा. इंदिरा नगर रुम नं. ०३ टिटवाळा ता. कल्याण जि. ठाणे मुळ रा. लिंगमापल्ली ता. शेरीलिंगपल्ली जि. हैद्राबाद शहर राज्य तेलंगणा ३) किशोर जितेंद्र शेट्ये वय २९ वर्षे रा. बिर्ला कॉलेजच्या मागे मिलन नगर धर्मविर शाळेच्या बाजुला चाळीत ता. कल्याण जि. ठाणे यांनी केला असल्याचे निष्पन्न झाल्याने व ते गुन्हा करून हैद्राबाद, राज्य तेलंगणा येथे पळून गेल्याचे निष्पन्न झाल्याने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे आदेशाने सपोनि/अमोल गवळी, पोहवा/४८६ संदीप विठोबा सुर्यवंशी, नेम. स्थानिक

गुन्हे शाखा पालघर पोहवा/४१२ भगवान आव्हाड, नेम. पालघर पोलीस ठाणे यांनी आरोपीतांना हैद्राबाद येथून ताब्यात घेऊन मोखाडा येथे आणले आहे.

सदर आरोपीतांना अटक करून त्यांची कसून चौकशी केली असताना आरोपीत क्र. १ व २ हे रेल्वेमध्ये पाणी विक्रीचा व्यवसाय करत असून आरोपीत क्र. ०३ हा आरोपीत क्र. १ व २ याचा मित्र आहे. यातील मयत हा आरोपीसोबत रेल्वेत पाणी बॉटल विक्रीचा व्यवसाय करीत असताना त्यांच्याकडून दरमहा पैशाची मागणी करीत असताना आरोपीत क्र. ०२ व ०३ यांना मारहाण केली होती व घटनेच्या दिवशी देखील पैसे मागण्याकरीता आरोपीताच्या घरी टिटवाळा येथे आला असता आरोपीतांनी त्यास दारु पाजून मयत यास घरातच लोखंडी पाईपने मारहाण करून आरोपीत क्र. ०१ ते ०३ यांनी बेशुध्द करून त्यास आरोपीत क्र. ०१ याच्या मारुती डिझायर या गाडीने खडवली मार्गे कसारा घाटातून खोडाळा रोडवरील कारेगाव शिवारातील वैतरणा नदीच्या पुलावर आणून आरोपीत क्र. ०२ याने त्यास पाईपने मारहाण करून आरोपीत क्र. ०१ याने मयताच्या डोकीवर दगड मारुन तसेच आरोपी क्र. ०३ याने सुऱ्याने छातीवर, पोटावर जागोजागी वार करून मयत यास वैतरणा नदीच्या पुलावरुन १२५ फुट उंचीवरुन खाली फेकून दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास सपोनि/प्रदिप गिते, प्रभारी अधिकारी, मोखाडा पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. शैलेश काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी जव्हार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा पालघर, सपोनि/प्रदिप गिते, प्रभारी अधिकारी मोखाडा पोलीस ठाणे, सपोनि/अमोल गवळी, पोउपनि/गणपत सुळे, पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई, पोहवा/दिपक राऊत, पोहवा/विजय ठाकुर,पोहवा/संजय धांगडा, पोहवा/कैलाश पाटील, पोहवा/नरेंद्र पाटील, पोहवा/राकेश पाटील, पोहवा/दिनेश गायकवाड, पोहवा/४८६ संदीप विठोबा सुर्यवंशी, पोना/कल्याण केंगार, पोशि/जामदार, पोशि/निकम सर्व नेम. स्थानिक गुन्हे शाखा पालघर तसेच पोहवा/४१२ भगवान आव्हाड, नेम. पालघर पोलीस ठाणे व सायबर पोलीस ठाणे पालघर येथील पोलीस अंमलदार यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.